# महाराष्ट्र शासन

ईमेलद्वारे-

क्र.एफएलडी-१९२२/प्र.क्र.२१८/फ-१०
महसूल व वन विभाग,
खो.क्र.४५५/४६० विस्तार,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २१/०८/२०२२.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय :** वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांना गोदाम इमारतीचे बांधकामाकरीता मौजे शिर्सुफळ, ता.बारामती, जि.पुणे येथील ०.९९ हे राखीव वनजमीन वळतेकरणाबाबत.

विषयांकित प्रकरणी खालील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करावेत.

१. प्रस्तावीत प्रकरणी वनभंग झालेला आहे. तरी याप्रकरणी दंडात्मक नक्त वर्तमान मूल्य (Net Present Value) वसूल/प्रस्तावीत करण्यात आले आहे किंवा कसे ?

२. नियोजन प्राधिकरणाने बांधकामासाठी दिलेल्या परवानगीची/आदेशाची प्रत सादर करावी.

३. गट क्रमांक ७९२ मधील ०.९९ हे राखीव वनजमीन वळतीकरण करण्यासाठी प्रस्तावीत करण्यात आली आहे. उर्वरीत १७.४० पैकी २ हेक्टर जमीन पर्यायी वनीकरणाकरीता दिली आहे. उर्वरीत १४.४० हे जमिन वन विभागाच्या ताब्यात आहे किंवा कसे याबाबतची माहिती सादर करावी.

४. प्रस्तावीत प्रकल्पाच्या बांधकाम नकाशाचे अवलोकन केले असता प्रकल्पासाठी १ हेक्टरपेक्षा जास्त जागा वापरात येणार असल्याचे दिसून येते, त्यामुळे प्रस्तूत प्रकरणी पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर जमिन प्रस्तावीत करावी लागेल किंवा कसे ?

(गणेश जाधव)
अवर सचिव, महसूल व वन विभाग

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव

१. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),पुणे.

२. उप वनसंरक्षक, पुणे.